# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

दूरध्वनी: 022-2216 3964/65/69 फॅक्स: 022-2216 3976

ई-मेलः mercindia@mercindia.org.in वेब-साईट www.mercindia.org.in

# जाहीर नोटीस

**प्रकरण क्र. ८०/२०११** **१४-२०११/१२**

## विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) खाली नोटीस

१ संपूर्ण महाराष्ट्रात विजेच्या राज्यांतर्गत व्यापारासाठी परवाना मंजूर करण्याकरिता मेसर्स ट्वेंटीफर्स्ट सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लिमिटेड (ज्यास यापुढे 'टीसीआयआयपीएल' असे संबोधण्यात येईल), कार्पोरेशन बिल्डींग, ओल्ड मोटर स्टँड, इतवारी, नागपूर – ४४०००८, यांनी अर्ज दाखल केला आहे.

२. 'टीसीआयआयपीएल'ने आयोगाकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह "www.tciipl.com" या संकेतस्थळावर आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या "www.mercindia.org.in" या संकेतस्थळावर उपलब्ध आहे किंवा ती आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही व्यक्तीस ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन पाहता येईल.

३. आयोगाकडे उपलब्ध असलेले दस्तऐवज विचारात घेऊन आयोगाचे सकृत्दर्शनी असे समाधान झाले आहे की, अर्जदार पहिल्या वर्षी ८० दशलक्ष युनिट आणि पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान हळूहळू वाढवत १०० दशलक्ष युनिटपर्यंत विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याकरिता पात्र आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००६ ने सुधारित केल्याप्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ मधील अटींनुसार अर्जदारास महाराष्ट्र राज्यात विजेचा राज्यांतर्गत व्यापार करण्याकरिता विजेचा व्यापारी वर्ग 'अ' म्हणून परवाना मंजूर करण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

४. संपूर्ण महाराष्ट्रात राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी आयोगाने परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाबाबत सूचना किंवा हरकती, असल्यास, त्या मागविण्यासाठी

विद्युत अधिनयम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) नुसार याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. या सूचना किंवा हरकती उपरोल्लेखित पत्त्यावर **दि. १० नोव्हेंबर, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी खाली सही करणाऱ्यास प्राप्त होतील अशा बेताने पाठवाव्यात. विनिर्दिष्ट केलेल्या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. **आयोगाने दि. १७ नोव्हेंबर, २०११ रोजी ११.०० वाजता, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क. १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात जाहीर सुनावणी निश्चित केली आहे** आणि ज्या व्यक्तिंनी सूचना किंवा हरकती दाखल केल्या आहेत अशा व्यक्ती या जाहीर सुनावणीस इच्छा असल्यास हजर राहू शकतील, त्यासाठी आयोगाकडून कोणता प्रवास खर्च/दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

सही

(कु. ना.खवारे)

सचिव, मविनिआ

ठिकाण : मुंबई

दिनांक : ०८.१०.२०११